MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात





श्री स्वामी समर्थ मंदिरात वंदनीय हिंदुह्रदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निम्मित महाआरती करण्यात आली यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अँड स्वप्नील भय्या गलधर व जिल्हा संघटक योगेश नवले व महेश चव्हाण सर, संदीप माने व हनुमान जी पांडे हे उपस्थित होते.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१२८ | गुरूवार दि.२३ जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -128 | THURSDAY DT.23 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# सायं दैनिक महाराष्ट्र 'आरंभ' सत्य लिहिणारचं

# सिंघम एस पी नवनीत कॉवत म्हणून आम्हा बीडकरांची पसंतीने माफीयांचे कंबरडे मोडणारच

- सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ'च्या दणक्याने कुंभेजळगाव परिसरातील दारू विक्रेते कोमात तर पोलीस प्रशासन क्शन मोडवर!
- वेलडन चकलांबा पोलीस, तुमच्या कामगिरीचे कौतुकच! कुंभेजळगाव परिसरातील दारू विक्री बंद झाल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त!
- पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या कामगिरीमुळे कुंभेजळगाव परिसर दारू मुक्त होणार



गेवराई : चकलांबा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील कुंभेजळगाव परिसरात मागील अनेक वर्षांपासून अवैध देशी-विदेशी दारूसह हातभट्टी दारूची गंगा वाहत होती. अनेक ठिकाणी घराघरात दारू मिळत असल्याने नागरिक व्यसनाधीन होत चालले होते. तसेच अनेकांचे संसार उद्धवस्त देखील झाले आहे. परंतु दारू विक्रेत्यांवर पाहिजे तशी कारवाई होत नसल्याने सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ ने सदरील परिसराचा आढावा घेऊन वेगवेगळ्या दोन बातम्या प्रसिद्ध करून पोलिस प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. त्यानुसार चकलांबा पोलिसांनी आपली यंत्रणा कामाला लावली अन् कुंभेजळगाव परिसरात सुरु असलेली बेकायदेशीर देशी विदेशी दारूसह हातभट्टी दारू विक्री पूर्णतः बंद केली. पूर्णतः दारू बंद झाल्याने चकलांबा पोलिसांवर ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केली असून, पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या कामगिरीमुळे कुंभेजळगाव परिसर दारू मुक्त होणार आहे.

**दैनिक महाराष्ट्र आरंभ या वृत्तपत्रात बातमी प्रकाशित होताच चकलांबा पोलीस प्रशासन सज्ज झाल्याने बेकायदेशीर देशी विदेशी दारूसह हातभट्टी दारूची विक्री करणाऱ्यांना मोठी धडकी भरली आहे. पोलीस निरीक्षक संदीप पाटील हे स्वतः कुंभेजळगाव परिसरात येवून बेकायदेशीर सुरू असलेली देशी विदेशी दारूसह हातभट्टी दारू विक्री करणाऱ्यांना चोप दिला आहे.**

कुंभेजळगाव परिसरात अनेक ठिकाणी घराघरात दारू विक्री होत असल्याने पहाटेपासूनच दारू पिणारे तळीराम आहेत. परिसरातील नागरिकांनी काम धंदे सोडून व्यसनाधीन होत चालले आहेत. यामुळे अनेकांचे संसार उद्धवस्त देखील झाले आहेत. या प्रकरणाची माहिती मिळताच दैनिक महाराष्ट्र आरंभ या वृत्तपत्राने दोन वेगवेगळ्या बातम्या प्रसिद्ध केल्या होत्या. याची दखल पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी घेऊन कुंभेजळगाव परिसरात अवैध दारू विक्री करणाऱ्यांना चांगला चोप दिला आहे. यामुळे अवैध देशी विदेशी दारूसह हातभट्टी दारूची विक्री बंद झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी अशी दारू विक्री कायमची बंद करून कुंभेजळगाव परिसर हे दारू मुक्त करण्यात यावा अशी अपेक्षा आहे.

दै.महाराष्ट्र आरंभ अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार विरोधात सतत लिहिणार!

पत्रकारितेलाच लोकशाहीचा चौथास्तंभ मानला जातो, लोकशाहीचा चौथास्तंभ या नात्याने आणि लोकशाही टिकवण्यासाठी दैनिक महाराष्ट्र आरंभच्या माध्यमातून गोरगरीब सर्व सामान्यांना न्याय देण्यासाठी तसेच अन्याय, भ्रष्टाचार तसेच बेकायदेशीर सुरू असलेले अवैध धंद्या विरोधात परखड लेखणीतून शासनदरबारी आवाज उठवणार, कोणत्याही दबावाला भीक न घालता परखड आणि निर्भीड लेखणी चालवून सर्व सामान्यांच्या हितासाठी दैनिक महाराष्ट्र सतत लिहीतच राहाणार, यामुळे सर्व सामान्यांनी अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार तसेच सुरू असलेले अवैध धंद्या विरोधी पुराव्यानिशी माहिती द्यावी, माहिती देणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवून आम्ही दैनिक महाराष्ट्र आरंभ च्या माध्यमातून जनहितासाठी प्रसिद्ध करू

बीड जिल्ह्याची गुन्हेगारी ही महाराष्ट्रासह भारतामध्ये गाजली बीडचा विहार झाला असं विरोधक बोलत असतानाच मात्र आता बीडला नव्याने दाखल झालेले बीडचे एसपी नवनीतकावत यांची सिंघम एसपी म्हणून बीडची जनता आता कौतुक करू लागली आहे त्यांच्याकडून माफी यांचे कंबरडे मोडण्याचे काम चालू आहे फक्त आता अनेक पोलीस स्टेशन मध्ये वादग्रस्त व भ्रष्टाचार हप्ते गोळा करणारे पोलीस कर्मचाऱ्यांची अधिकाऱ्यांची उचल बांगडी करणे गरजेचे आहे तर नवनिर्वाचित एस पी सिंघम कारवाया करत असताना त्यांना बीड जिल्ह्यातील जनतेने साथ देण्याची गरज आहे जिथे कुठे दोन नंबरचा माफिया भोकाळा असेल किंवा मुंडके वर काढत असेल त्या ठिकाणी थेट एसपीसी संपर्क जनतेने साधावा असे आव्हान सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ करत आहे.

## जि. प. प्रा. शाळा शहापूर मजरा येथे सुभाष बोस यांची जयंती साजरी



तालखेड ।प्रतिनिधी

माजलगावं तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शहापूर मजरा येथे नेताजी सुभाष चंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या पाथमेच पूजन पत्रकार प्रकाश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले या वेळी उपस्थित शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष गाढवे माजी सरपंच प्रकाश आळणे, शाळेचे मुख्याध्यापक संतोष साबळे ,सहशिक्षक चव्हाण आप्पासाहेब व चव्हाण महादेव हे उपस्थित होते. या सर्वांनी नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली साबळे सर यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या विषयी माहिती सांगत असताना नेताजी भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रमुख व्यक्तिमत्व होते. त्यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली त्यामुळे दुसऱ्या महायुद्धात रणांगणावर भारतीय सैनिकांनी ब्रिटिशांचा सामना केला.स्वातंत्र्य लढ्यात नवीन ऊर्जा भरणारे नेताजी सुभाष चंद्र बोस यांचा जन्म२३ जानेवारी १८९७ कटक येथे झाला. नेताजी सुभाष चंद्र बोस यांची सन १९३८ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड झाली नंतर त्यांनी राष्ट्रीय आयोगाची स्थापना केली .पुढे दुर्दैवाने त्यांची विमान अपघातात निधन झाले अशा या महान क्रांतिकारी योद्धांना विनम्र अभिवादन करून विद्यार्थ्यांना त्यांच्यासारखे लढाऊ व्हावे असे आवाहन केले.



## रेल्वे थांबत कशी नाही थांबलीच पाहिजे रेल्वे थांबा कृती समितीची आक्रोश मागणी

आज बीड इमामपूर रोड रेल्वे थांबा बैठक प्रसंगी कृती समितीची बीड रेस्ट हाऊस येथे बैठक झाली या बैठकीत सर्व पक्षीय नेते कार्यकर्ते उपस्थित होते, राजकीय पक्ष बाजूला सोडून रेल्वे कृती समिती बनविण्यात आली आहे, या बैठकीत सर्वांच्यामते दैनिक पार्श्वभूमी चे संपादक श्री गंमत भाऊ भंडारी यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली व कृती समितीच्या नूतन अध्यक्षासह सर्व कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मंत्री नामदार श्री धनंजय मुंडे साहेब यांना बीड इमामपूर रोडवरच रेल्वे थांबा करा असे निवेदन देऊन विनंती करण्यात आली आहे, यावेळी कृती समितीचे नूतन अध्यक्ष श्री गंमत भाऊ भंडारी प्रकाश आंबेडकरनगर इमामपुर रोड बार्शी नाका कृती समितीचे कार्याध्यक्ष खुर्शीद आलम, ज्येष्ठ नेत्या सौ.सुशीला ताई मोराळे,स्वप्निल भैया गलधर,बी.बी.जाधव, सुनील सुरवसे, लोकपत्रकार भागवत तावरे, सुहास पाटील, हाशम बागवान,राजू जोगदंड,मनोज जाधव,शेख अखील, विष्णू निसर्गण, संजय गुरव, आदिनाथ भांडवले, बाबा जाधव, प्रा.रफिक बागवान,महेश सिंगन, शेख अजहर, मोमीन सलीम,राजू ढोले, वजीर अत्तार, नारायण ढोकने, दीपक चौगुले, शेख जाकेर, मोमीन रफियोदीन, गहिनीनाथ मस्के,अमोल अहिरे, शेख अय्युब, महेश चांडक, लतिफ पठाण, आदीनाथ भांडवले, सगाळकर सुशांत,व इतर सर्व सदस्य सह कृती समितीचे हजारो सदस्य हजर होते, वरील मागणी न झाल्यास लवकरच पुढील निर्णय घेण्यात येईल

# चैतन्य स्वामी पुण्यतिथीचा महाप्रसाद होणार पर्यावरण पूरक

## थर्माकोलच्या पात्रांना फाटा देत पानांच्या पारंपरिक पत्रावळीवर होणार महाप्रसादाचे वाटप

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील देवळाली येथे सुरू असलेल्या चैतन्य स्वामी पुण्यतिथी सोहळ्याची काल्याच्या महाप्रसादाची पंगत पर्यावरण पूरक पात्रमध्ये महाप्रसाद देऊन पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे पर्यावरण पूरक पात्रांची देणगी पर्यावरण क्षेत्रात काम करणारे अशोक डोके यांनी दिली आहे. आजच्या जलद गतीच्या जगात, जेव्हा सोयीचेपण जास्त महत्त्वाचं ठरतं, तेव्हा आपण रोज वापरत असलेल्या पदार्थांच्या दीर्घकालीन परिणामांना दुर्लक्ष करणे सोपे होते. त्यामध्ये एक पदार्थ, थर्मोकोल (विस्तारित पॉलीस्टायरीन), एक उदाहरण आहे. थर्मोकोल प्लेट्स कमी किमतीच्या, जाड आणि सहज उपलब्ध असलेल्या असल्या तरी, पर्यावरणावर त्यांचा गंभीर परिणाम होतो, कारण हे पदार्थ नैसर्गिकरित्या सडत नाहीत आणि स्थानिक समुदायांमध्ये त्यांचं पुनर्वापरही होत नाही.

थर्मोकोल प्लेट्स सार्वजनिक समारंभांमध्ये, विशेषत: मोठ्या समारंभांमध्ये, वापरण्याचा एक सामान्य पर्याय असतो, जसे की देवळालीतील महाप्रसाद कार्यक्रम. श्री चैतन्य स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीच्या समारंभाला दरवर्षी हजारोंच्या संख्येने भक्त येतात. या समारंभात सप्ताहभर कीर्तने, भजने आणि रामकथा चालतात, आणि तेथून समारंभाच्या शेवटी मोठ्या प्रमाणावर महाप्रसाद वितरित केला जातो.

काही वर्षांपासून महाप्रसादाच्या वितरणासाठी थर्मोकोल प्लेट्सचा वापर केला जात होता. थर्मोकोल प्लेट्स जरी सस्त्या आणि उपयोगात सोप्या असल्या तरी, ते पर्यावरणासाठी धोकादायक ठरतात. या प्लेट्स नैसर्गिकरित्या सडत नाहीत आणि पुनर्वापराची व्यवस्था स्थानिक स्तरावर साधारणतः नसते. परिणामी, महाप्रसादाचा कार्यक्रम संपल्यानंतर टाकलेले थर्मोकोल प्लेट्स नद्या, तलाव आणि खुले परिसरात जाऊन साचतात, ज्यामुळे प्रदूषण वाढते आणि पारिस्थितिकीला हानी पोहचते हे सामान्य लोकांना माहीत नव्हते.

या गंभीर समस्येचे भान ठेवून, आशोक डोकें, पर्यावरण क्षेत्रातील सेवा कंपनी 'मस्कमेलन एन्वटेक प्रा. लि.'चे सहसंस्थापक, यांनी बदल घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला. देवळाली येथील मुळचे असलेले आणि पुण्यात राहणारे अशोक डोकें, पुण्यतिथी समारंभात थर्मोकोल कचऱ्याच्या वाढत्या पर्यावरणीय परिणामाने चिंताग्रस्त झाले होते. त्याने आयोजकांशी चर्चा करून २०२५ च्या महाप्रसादासाठी पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर



करण्याचा सुचवला.

पलस या वृक्षाच्या पानांनी बनवलेली हस्तनिर्मित प्लेट्स वापरण्याचा निर्णय घेतला गेला, मुख्यतः या पर्यावरणपूरक विकल्पांची किंमत थर्मोकोलच्या तुलनेत जास्त होती. पण, 'मस्कमेलन एन्वटेक' चे संस्थापक, आशोक राजाराम डोकें आणि नितीन म्हातारदेव गव्हाणे यांनी या अतिरिक्त खर्चाची जबाबदारी स्वत: घेतली आणि दान स्वरूपात या प्लेट्सची व्यवस्था केली.या उपक्रमात आयोजक, स्थानिक नागरिक आणि 'मस्कमेलन एन्वटेक' च्या सहकार्याने २०२५ च्या महाप्रसादाच्या समारंभात थर्मोकोल कचऱ्याचे नुकसान होणार नाही. नैसर्गिक वृक्षांच्या पानांनी बनवलेली बायोडिग्रेडेबल प्लेट्स पर्यावरणाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा संदेश देतात.हा उपक्रम केवळ प्लेट्स बदलण्याबद्दल नाही, असे आशोक डोकें म्हणाले. हा एक पर्यावरणीय जबाबदारीचा संदेश आहे. बायोडिग्रेडेबल प्लेट्स वापरून, आपण टिकाऊपणाच्या संस्कृतीला प्रोत्साहन देत आहोत आणि आशा आहे की, हा बदल इतर गावांनाही प्रेरणा देईल.पर्यावरणपूरक विकल्प स्वीकारण्याचा हा निर्णय, देवळालीसाठीच नव्हे तर एकूणच समाजासाठी एक योग्य दिशा आहे. बायोडिग्रेडेबल प्लेट्स थर्मोकोलच्या तुलनेत नैसर्गिकरित्या सडतात, ज्यामुळे पर्यावरणावर दीर्घकालीन परिणाम होत नाही. हा उपक्रम हे दाखवतो की, स्थानिक समुदाय कसा एकत्र येऊन पर्यावरणीय समस्यांना तोंड देऊ शकतो, जरी आर्थिक आव्हाने असली तरी.देवळालीतील पर्यावरणपूरक महाप्रसाद प्लेट्सचा निर्णय हा एक छोटा पण महत्त्वाचा पाऊल आहे आणि तो इतर प्रदेशांना देखील प्रेरणा देईल.

---

# बिंदुसरा नदी वरील पुल कम बंधारा हे लोकनेते विनायकराव मेटे साहेबांचे स्वप्न

**बिंदुसरा नदी वरील पुल कम बंधारा व्हावा यासाठी लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी पाठपुरावा केला कुणीही एकटयाने श्रेय घेवू नये - शेषेराव तांबे**

बीड (प्रतिनिधी)

बीड येथील बायपसचे काम जलद गतीने व्हावे , बिंदुसरा नदी वरील बार्शी नका परिसरातील पुल व्हावा आणि त्याच बरोबर बिंदुसरा नदीवर बीड शहरात पुल कम बंधारा करावा यासाठी लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा केली त्यामुळे होत असलेल्या पुल कम बंधाऱ्याचे श्रेय कुणीही एकट्याने घेवू नये.

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी आपल्या हयातीत बीड शहराच्या विकासासाठी आणि शहरातील समस्या सोडवण्यासाठी नेहेमीच पुढाकार घेतला आहे. धुळे - सोलापूर महामार्गाचे काम सुरू असताना त्यांनी बीड बायपास लवकरात लवकर व्हावा यासाठी प्रयत्न केले आणि तो तात्काळ सुरू देखील केला. बीड शहरातील बार्शी नाका येथील पुल हा महामार्गा अंतर्गत येत नव्हता तरी देखील पाठपुरावा करून तो पुल आयआरबी च्या यांत्रने कडून पाठपुरावा करून करून घेतला या नंतर मा. नितीन गडकरी साहेब तत्कालीन



मुख्मंत्री मा. देवेंद्र फडणवीस साहेब आणि त्यानंतर तत्कलिन उपमुख्यमंत्री मा.अजित पवार साहेब यांच्या कडे पाठपुरावा करून बीड शहरात बिंदुसरा नदीवर पुल काम बंधारा व्हावा यासाठी प्रयत्न केले त्यामुळे होत असलेल्या पुल कम बंधाऱ्यात लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचे मोठे योगदान आहे तेव्हा श्रेय कुणीही एकट्याने घेवू नये असे शिवसंग्रामचे शेषेराव तांबे यांनी म्हटले आहे.

---

# सामाजिक कार्यात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे-श्रीराम आरगडे

## पंचमुखेश्वर संस्थान येथे रा.से.यो. शिबीराचे उद्घाटन संपन्न




गेवराई ।प्रतिनिधी

माणसाची सेवा हीच ईश्वराची सेवा आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक माणसांची सेवा करतात, परिसराची स्वच्छता करतात, आरोग्य विषयक जनजागृती करतात हे काम अतिशय मौलिक आहे अशा शिबिरातून विद्यार्थ्यांची जडणघडण होते. विद्यार्थ्यांनी सामाजिक कामात नेहमी सहभागी होऊन समाजकार्य करावे असे आवाहन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

कला व विज्ञान महाविद्यालय आणि जयभवानी कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विशेष हिवाळी शिबीर पंचमुखेश्वर देवस्थान रानमळा-भाटेपुरी ता. गेवराई जि. बीड येथे संपन्न होत असून या शिबीराचे उद्घाटन मंगळवार दि. २१ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले. जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे, सरपंच बळीराम चव्हाण, उपसरपंच विश्वाभंर खंडागळे, जयभवानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सहप्रशासनाधिकारी प्रा. गोगुले, प्रताप हातोटे यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रारंभी संत गाडगे महाराज यांच्या प्रतीमेचे पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी प्रमोद गोरकर, प्रा. गोगुले, प्रताप हातोटे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाल प्राचार्य व्हि.पी. राठोड, डॉ.सदाशिव सरकटे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रामहारी फाटक, प्रा. लगड एस.एस., डॉ बाळासाहेब सरपते, प्रा. डॉ. राणी जाधव, प्रा. रिंगणे, प्रा. बडवे, प्रा.चौधरी यांच्यासह सर्व प्राध्यापक व रा.से.यो. स्वयंसेवक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

---

# आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांना अज्ञात व्यक्तीकडून जीवे मारण्याची धमकी

माजलगाव । आपला बळीराजा

आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांना अज्ञात व्यक्तीकडून भ्रमणधनीद्वारे जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.सविस्तर माहिती अशी की दि. २१/०१/२०२५ रोजी राजेश घोडे रा. शिवाजी महाराज चौक माजलगाव जि.बीड येथील रहीवाशी आसुन आज दिनांक २१/१/२०२५ रोजी सायंकाळी ०५.१४ मिनि ते आपल्या कार्यालयात बसलेले असताना त्यांना अज्ञात नंबर वरून आज्ञात व्यक्तीने अश्लिल भाषेत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार माझ्या जिवितास धोका आहे मी सामाजिक काम करत असल्यामुळे कोणी तरी विकृत मानसिकता असलेली व्यक्ती माझ्या वरती डोळा ठेवुन आहे. हे आसे प्रकार कोण का ? करत आहे हे मला पण माहीत नाही..... या नंबर वरून पुरूष व्यक्ती बोलली आहे तरी मला जिवीतास याच्या कडुन धोका आहे .त्या विकृत मानसिकता आसलेल्या व्यक्तीवर योग्य ती कार्यावही करावी, अशा आशयाची तक्रार क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांनी माजलगाव शहर पोलीस स्टेशन येथे दिली आहे.



---

# १००% टक्के अंधत्व असलेल्या रुग्णाची पत्रकार शेख हमीद यांच्या पुढाकाराणे झाले मोठ्या गाठीचे ऑपरेशन

## रुग्णाच्या नातेवाईकांनी पत्रकार शेख हामीद यांचे मानले आभार

मजालगाव । आपला बळीराजा

लोकसेवा संकल्प सा. प्रतिष्ठान चे संवस्थापक अध्यक्ष व दै. सूर्योदय वृतपत्राचे प्रतिनिधी शेख हमीद हे नेहमी समाज सेवा करण्या मधे आग्रेसर असतात व समाजसेवेत अग्रेसर असणारे दोन-चार दिवसापासून ते बीड जिल्हा रुग्णालय येथे आपल्या नातेवाईकाच्या उपचारासाठी चार ते पाच दिवस बीडला मुक्कामी राहत असताना.

दिनांक २१/०१/२०२४ रोजी (४) नं. वार्डमध्ये एका रुग्णाजवळ सहज बसुन त्यांना विचार पूस केली तर रुग्णाच्या नातेवाईकाने सांगितले की, गौतम कल्याण गायकवाड रा.मादळमोही ता.गेवराई जी.बीड हे माझे भाऊ आहेत त्यांच्या अवघड जागेवरच्या गाठिचे ऑपरेशनकरण्यासाठी आम्ही मादळमोही येथून बीड जिल्हा रुग्णालय



येथे आणले आणि विशेष म्हणजे त्यांना १००%टक्के अंधत्व आहे. ऑपरेशन लवकरात लवकर होऊन आम्ही घरी जावे असे आम्हाला वाटते.

त्याच वेळी शेख हमीद यांनी आपली माणुसकी दाखवत आपल्या जवळच्या नातेवाईकाला सोडून त्यांनी संबंधित पेशंटला आपले नातेवाईक समजून त्वरित डॉ. राऊत यांच्याशी संपर्क व चर्चा करुन विनंती केली आणि दुसऱ्याच दिवशी ऑपरेशन करुन घेतले. व इथेच न थांबता त्यांची सुट्टी होई पर्यंत जेवणाची सुद्धा सोय करुन दिली. यामुळे बीड जिल्ह्यात व महाराष्ट्रात पत्रकाराबद्दल अनेक टिपणी होतात की पत्रकार हा फक्त लेखणीतून किंवा आपल्या वर्तमानपत्रातून बातम्या द्वारे समाजाला न्याय देतो परंतु आज हे सुद्धा सिद्ध झाले की ग्राउंड लेव्हलवर राहून पत्रकारिता करता येते हे मात्र शेख हमीद यांनी करून दाखवले त्यामुळे गायकवाड कुटुंबासह नातेवाईकांनी समाजसेवक

---

# डॉ.महेश पवार रशिया येथे एम.बी.बी.एस. करून भारतातील एमसीआय परिक्षा उत्तीर्ण

बदामराव पंडित यांनी केला सत्कार

गेवराई (प्रतिनिधी ) गेवराई येथील माजी राज्यमंत्री बदामरावजी पंडित यांचे स्वीय सहाय्यक पंडित पवार यांचे चिरंजीव डॉ.महेश पवार यांनी रशिया येथे एमबीबीएस पूर्ण करून भारतात आल्यानंतर होणाऱ्या एमसीआय या परिक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. डॉ.महेश पवार यांनी शालेय जीवनापासूनच आपल्याला डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगत कठोर मेहनत करून रशिया येथील नॉर्थेर्ण स्टेट मेडिकल युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळवला यानंतर त्यांनी रशिया येथून एमबीबीएस पूर्ण करून डॉक्टर डिग्री मिळवली व भारतात आल्यानंतर एमसीआय या परीक्षेतही १६८ गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल त्याचे माजी राज्यमंत्री बदामरावजी पंडित, सौ.गिरीकाताई पंडीत , माजी जि प सभापती युधाजीत



पंडित, युवानेते रोहित पंडित, युवानेते यशराज पंडित, पंडित पवार, संजीव पवार, रामेश्वर सावंत, डॉ.रामेश्वर राजगुडे, तुळशीदास पवार, सुरज पवार, रोहित राजगुडे, धीरज सावंत, ऋतूराज राजगुडे, मनोज सव्वासे, मिलींद सव्वासे, संगीता पवार, आल्का पवार, संगीता राजगुडे आम्रता पवार ,व डॉ.प्रविणजी दोरके, यांच्या मार्गदर्शनाखाली,यांच्यासह सर्व मित्रपरिवार यांनी त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

---

# महाराष्ट्राला मोठा धोका, 'या' दहशतवादी संघटनेचं २० जिल्ह्यात नेटवर्क

केंद्रीय गुप्तचर खात्याचा इशारा

मोठी बातमी समोर येत आहे. आता बांगलादेशी आणि रोहिंग्या रडारवर असून, केंद्रीय गुप्तचर खात्याकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईसह महाराष्ट्रात बांगलादेशच्या जमात ए इस्लामी, या दहशतवादी संघटनेचे स्लीपर सेल कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. या स्लीपर सेलचं नेटवर्क राज्यातील तब्बल २० जिल्ह्यांमध्ये असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे केंद्रीय गुप्तचर खात्यासह, राज्यातील गुप्तचर यंत्रणा आणि पोलीस प्रशासन सतर्क झालं आहे. तपास



यंत्रणा सक्रिय झाली असून, युद्धपातळीवर रोहिंग्या आणि बांगलादेशींचा शोध सुरू आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार महाराष्ट्रातील जवळपास वीस जिल्ह्यांमध्ये बनावट जन्म प्रमाणापत्र आणि दाखले वितरीत झाले असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. राज्यात जवळपास दीड ते दोन लाख बांगलादेशी घुसखोर असू शकतात,असा तपास यंत्रणेचा अंदाज आहे. या घुसखोरांना मदत करणारे स्थानिक आणि प्रशासनातील अधिकारी देखील आता सरकारच्या रडारवर असणार आहेत. बांगलादेशातील सत्ता बदलानंतर पुन्हा एकदा जमात ए इस्लामी संघटना कार्यरत झाली असून, या दहशतवादी संघटनेचा भारताला मोठा धोका असल्याचं गुप्तचर विभागानं म्हटलं आहे.

# २४ डिसेंबर रोजी मोठ्या संख्येने उपस्थित रहा - रुपाली देशपांडे

बीड ।प्रतिनिधी

शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या तथा लेखिका रूपाली देशपांडे यांनी बीड शहर स्वच्छतेकरिता बीड नगर परिषद प्रशासनासह जिल्हा प्रशासनाला भेटून निवेदन देण्याचे ठरविले आहे. याकरिता शहर स्वच्छतेसाठी तळमळ असणाऱ्या समविचारी नागरिकांनी दिनांक २४ जानेवारी २०२५ शुक्रवार रोजी दुपारी ०१:०० वा. बीड नगर परिषद येथे एकत्र यावे तिथे मुख्याधिकारी यांना निवेदन दिल्यानंतर सर्वांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन देण्यात येणार आहे. तरी सर्वांनी



निवेदन द्यायला यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहर स्वच्छतेसाठी सर्व संघटना, विविध सामाजिक संस्था आणि शहरातील महिला/पुरुषांनी एकत्र यावे. काही दिवसांपूर्वी बीड शहर स्वच्छेतेसाठी मुख्याधिकारी नीता अंधारे यांना भेटण्यासाठी गेल्यावर त्या काही भेटल्या नाहीत. म्हणून आता दिनांक २४ जानेवारी २०२५ शुक्रवार रोजी दुपारी ०१:००, वा परत एकदा निवेदन दिले जाणार आहे. बीड शहरातील प्रत्येक कॉलनीत, प्रत्येक गल्लीत एक कचरा कुंडी पाहिजे. विद्युत खांबावर लाईट ची व्यवस्था पाहिजे. बीड शहराला चार दिवसाआड नळांना पाणी सोडायला हवे. इत्यादी मागण्याचे निवेदन देणार आहे. म्हणून सर्वांना विनंती आहे की, शहर स्वच्छतेसाठी या कामात साथ द्या. एक तिच्या बाळाला नक्कीच चांगले फळ मिळते. बीड शहराच्या स्वच्छते करिता आपण सर्वजण मिळून करूया. म्हणून महिला, पुरूषांसह सर्व सामाजिक संघटना एकत्र आल्यास चांगले कामे होईल आहे. म्हणून तुम्हा सर्वांचे येणे आवश्यक आहे. याकरिता दिनांक २४ जानेवारी रोजी दुपारी ठीक ०१:०० वा सर्वांनी मिळून प्रथम बीड नगर परिषद व नंतर जिल्हाधिकारी कार्यालयात एकत्र यावे असे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या तथा लेखिका रुपाली देशपांडे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# डॉ.महेश पवार रशिया येथे एम.बी.बी.एस. करून भारतातील एमसीआय परिक्षा उत्तीर्ण

## बदामराव पंडित यांनी केला सत्कार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : येथील माजी राज्यमंत्री बदामरावजी पंडित यांचे स्वीय सहाय्यक पंडित पवार यांचे चिरंजीव डॉ.महेश पवार यांनी रशिया येथे एमबीबीएस पूर्ण करून भारतात आल्यानंतर होणाऱ्या एमसीआय या परिक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

डॉ.महेश पवार यांनी शालेय जीवनापासूनच आपल्याला डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगत कठोर मेहनत करून रशिया येथील नॉर्थेर्ण स्टेट मेडिकल युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळवला यानंतर त्यांनी रशिया येथून एमबीबीएस पूर्ण करून डॉक्टर डिग्री मिळवली व भारतात आल्यानंतर एमसीआय या परीक्षेतही १६८ गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल त्याचे माजी राज्यमंत्री बदामरावजी पंडित, सौ.गिरीकाताई पंडीत , माजी जि प सभापती युधाजीत पंडित, युवानेते रोहित पंडित, युवानेते



यशराज पंडित, पंडित पवार, संजीव पवार, रामेश्वर सावंत, डॉ.रामेश्वर राजगुडे, तुळशीदास पवार, सुरज पवार, रोहित राजगुडे, धीरज सावंत, ऋतूराज राजगुडे, मनोज सव्वासे, मिलींद सव्वासे, संगीता पवार, आल्का पवार, संगीता राजगुडे आम्रता पवार ,व डॉ.प्रविणजी दोरके, यांच्या मार्गदर्शनाखाली,यांच्यासह सर्व मित्रपरिवार यांनी त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

# ॲड.आदर्श अरुणराव जाधव यांची महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना राज्य सचिव (लिगल सेल) पदी निवड

ड.जाधव हे पोलीस बॉईज संघटने मध्ये मराठवाडा अध्यक्ष पदावर कार्यरत होते. या पदावर असताना पोलिसांचे विविध प्रकारचे प्रश्न, पोलीस पाल्यांच्या समस्या , पोलीस परिवाराचे प्रश्न सोडवण्यासाठी काम केले.ही संघटना पूर्ण महाराष्ट्रात काम करत असून, पोलिसांचे विविध प्रकारचे प्रश्न असतील. त्यात त्यांना वैद्यकीय सुविधा, पोलीस पाल्यांच्या शिक्षणाचा प्रश्न असेल, त्यांचा राहण्याचा प्रश्न असेल यासाठी वेळोवेळी मा. गृहमंत्री यांना पाठपुरावा करून त्या मागण्या मान्य व्हाव्या यासाठी प्रयत्न केले.तसेच इतर सामाजिक कार्यात देखील मा. राहुल दुबाले यांचा मार्गदर्शनाखाली उत्तम काम करत आलेले असून. ते वकिली क्षेत्रा मध्ये देखील उत्तम अशा



प्रकारे आपली सेवा देत आहेत. त्यांचा या शिक्षणाचा फायदा या पदावर काम करत असताना नक्कीच संघटनेला व पोलीस कर्मचाऱ्यांचे, पाल्यांच्या व परिवाराचे प्रश्न सोडवण्यासाठी होईल.

मा.राहुल दुबाले(संस्थापक अध्यक्ष )यांचा मार्गदर्शनाखाली ड.आदर्श जाधव यांची निवड करण्यात आली. त्यांचा या निवडीबद्दल सर्व मित्र परिवार तर्फे सर्व स्तरातून अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा.

# देगलुर येथे लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य महिला आघाडी नूतन कार्यकारणी जाहीर

## महिला सुरक्षेसाठी नेहमी आम्ही कटिबध..पोलीस निरीक्षक – मारोती मुंडे

देगलुर ।प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य पत्रकार आणि जणसामान्य नागरिकांसाठी न्याय देण्याचे कार्य करत असल्याने आणि लोकशाही हे नाव सर्वाना आपलं वाटतं म्हणून खूप लोक संघ वाढीसाठी काम करत आहेत. संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नूतन कार्यकारणी कार्यक्रम होत आहेत. सं. अ. बीबी वैद्य, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके पाटील, प्रदेश अध्यक्ष निलोफर शेख,प्रदेश कार्याध्यक्ष आयेशा खान, प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, मराठवाडा अध्यक्ष प्रभाकर पांडे, मराठवाडा सचिव अनिस कुरेशी यांच्या आदेशानुसार नांदेड जिल्हा




अध्यक्ष अरिफ सय्यद यांनी देगलूर तालुका महिला आघाडी ची नूतन कार्यकारणी ची निवड केली आहे.

दि.२२ जाने.२०२५ रोजी सय्यद कम्प्युटर येथे लोकशाही पत्रकार संघ महिला आघाडी नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती देगलूर पोलीस स्टेशन चे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक श्री मारोती मुंडे हे उपस्थित होते. लोकशाही पत्रकार संघ महिला आघाडी तालुकाध्यक्षपदी दिपाली संजय पाटील ,उपाध्यक्षपदी संगीता विशाल कदम,कार्याध्यक्ष पदी शेख रजिया मैनोदीन, कोशाध्यक्ष पदी दीपाली कालिदास बिरादार, सदस्य पदी छाया मारोती कावटवार यांची निवड करण्यात आली. पोलीस निरीक्षक श्री मारोती मुंडे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचे सत्कार केले. तसेच कौतुक ही केले की महिला आघाडी आहे, जेणेकरून महिलांचे प्रश्न तसेच अडचणी ते मांडू शकतील. या कार्यक्रमात लोकशाही पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा.सय्यद आरिफ सर,संचालक सय्यद कम्प्युटर, तालुकाध्यक्ष श्री सतीश क्यादारे सर, मुखेड तालुकाध्यक्ष जयसिंग कांबळे सर,उपाध्यक्ष श्री मदने सर हे उपस्थित होते.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढवण्यात यावी... माजी ज्येष्ठ नगरसेवक विष्णू (भैय्या) शामराव वाघमारे

बीड।प्रतिनिधी

सविस्तर वृत्त असे की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढवण्यात यावी. बाबासाहेबांच्या येणाऱ्या जयंतीच्या पूर्व पूर्वसंध्येला या कामाची सुरुवात करून अनुयायीच्या मागणीची दखल घेण्यात यावी.याबाबतचे निवेदन माजी ज्येष्ठ नगरसेवक विष्णू (भैय्या) शामराव वाघमारे यांनी बीड नगरपरिषद मुख्याधिकारी यांना देण्यात आली आहे. तसेच बीड विधानसभेची आमदार मा. संदीप (भैय्या) क्षीरसागर यांनाही निवेदन देण्यात आले आहे. यावेळी आमदार साहेबांनी या विषयाचा



पाठपुरावा शासन दरबारी करून हा प्रश्न सोडवण्यात येईल असे आश्वासन दिले.



श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे गेल्या १३वर्षापासुन दरवर्षी वैराग्यमुर्ती संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी साजरी करण्यात येते याही वर्षी दि.२२ बुधवार रोजी रात्री संत वामन भाऊ महाराज यांच्या जिवन चरीत्रावर जेष्ठ किर्तनकार ह भ प मोहन महाराज खरमाटे यांची किर्तनसेवा संपन्न झाली यावेळी महाराजांचे स्वागत कार्यक्रमाचे आयोजक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ राजेंद्र सानप यांनी केले किर्तनास टाळकरी मृदंगाचार्य,विणेकरी, यांच्या सह असंख्य भाविक उपस्थित होते.

# आष्टी येथील पाटबंधारे उपविभागीय कार्यालय असून अडचण नसून

## वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे शेतकऱ्यांची मागणी

**सुरेश/कांबळे**

**आष्टी ।प्रतिनिधी**

**तालुक्यातील कृष्णा खोरे महामंडळ अंतर्गत उपविभागीय अभियंता लघु पाटबंधारे जलसंधारण विभागाचे तीन कार्यालय असून या विभागातील अभियंते सतत गैरहजर राहत असल्याने ही कार्यालय म्हणजे असून अडचण नसून खोळंबा होऊन बसली असून हे कार्यालय फक्त शोभेच्या वस्तू झाल्याचे दिसून येत आहे अशी भयानक अवस्था या कार्यालयाची झाली आहे शासनाने शेतकऱ्यांना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आष्टी येथे कृष्णा खोरे महामंडळाचे उपविभागीय अभियंता लघु पाटबंधारे यांचे शासकीय कार्यालय आहे या कार्यालयामार्फत शेतकऱ्यांच्या शेतजमिनी बाबत पाण्याच्या विविध वापराच्या संदर्भात पाणी फायदे सामान्य धोरण मार्गदर्शक तत्वे**

आणि मूल्यांकनासाठी कार्यक्रम घेणे इत्यादी बाबी तसेच सिंचन तलाव पाझर




तलाव, कोल्हापुरी बंधारे ,पक्के बंधारे ,वळण बंधारे , लघुपाटबंधारे बंधाऱ्याचे योजनेचे बांधकाम केले जातात मात्र गेले अनेक दिवसापासून या कृष्णा खोरे महामंडळ अंतर्गत येणाऱ्या उपविभागी लघु पाटबंधारे कार्यालयात प्रभारी म्हणून उपविभागी अभियंता म्हणून कार्यरत असलेले रमेश आडे हे सतत गैरहजर राहत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागत आहेत या कार्यालयात कसल्याच प्रकारची माहिती शेतकऱ्यांना मिळत नाही या कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यावर शेतकऱ्यांनी प्रस्तुत प्रतिनिधीकडे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे वरिष्ठांनी या प्रकरणाकडे गांभीरणी लक्ष देऊन अचानक या ठिकाणी स्पोर्ट पंचनामा करून अधिकारी का येत नाहीत व त्याची उकल करावी अशी मागणी आता शेतकरी वर्गात होत आहे

# स्वामी रामानंद तीर्थ यांनी निजामी राजवट संपुष्टात आणली -डॉ.शिवराज बोकाडे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

सरंजामी,जुलमी निजामी राजवटीविरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ यांनी कणखर भूमिका घेतली जन आंदोलन उभारून निजामी राजवट संपुष्टात आणली व हैद्राबाद मुक्ती लढा यशस्वी केला असे मत नांदेडच्या यशवंत महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.शिवराज बोकाडे यांनी व्यक्त केले. ते स्वामी रामानंद तीर्थ पुण्यतिथी निमित्त आयोजित व्याख्यानात उदबोधन करताना प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी यो.शि. संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते .मंचावर यो.शि.संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे,उपाध्यक्ष ऍड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेष वैद्य,प्राचार्य डॉ.पी.आर. थारकर आदी उपस्थित होते.

डॉ.सुरेश खुरसाळे म्हणाले की, स्वामी रामानंद तीर्थ यांनी सर्वस्व पणाला लावून सरंजामी निजामी राजवटीविरुद्ध संघर्ष केला मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळवून दिले व संस्थानातील जनतेच्या प्रगतीच्या वाटा खुल्या केल्या अध्यक्षीय समारोपात चंद्रशेखर बर्दापूरकर म्हणाले की मराठवाडा मुक्ती लढा कोणत्याही धर्माविरुद्ध नव्हता. स्वामीजींचे सर्वच कार्य समजून घेतले पाहिजे.

सुरूवातीला अशोक खंदारे,सुधीर कुलकर्णी, स्मिता धावडकर ,राहूल कुलथे




## पुण्यतिथी निमित्त जागर लोकशाहीच्या कार्यक्रमात उद्बोधन

यांनी स्वर सुमनांजली सादर केली. पाहुण्यांच्या हस्ते शालेय स्तरावरील बुद्धीबळ स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.शैलजा बरुरे यांनी केले.संचलन डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी तर आभार प्राडॉ.प्रविण भोसले यांनी मानले. कार्यक्रमासाठी संस्था, पदाधिकारी,संचालक संस्थेच्या विविध विभागाचे प्रमुख, प्राध्यापक,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी , विद्यार्थी उपस्थित होते.



# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी

हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांचे शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून सर्व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी मोठ्या उत्साहात जयंती साजरी केली. यावेळी जिल्हा संघटक रतन तात्या गुजर,तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, उपतालुकाप्रमुख अशोकजी सगळे, उपतालुकाप्रमुख प्रकाशजी धुताडमल, युवासेना उपजिल्हाप्रमुख ऋषी भैय्या गिरी, युवासेना उपतालुकाप्रमुख मनोज भैय्या डोंगरे,विनोद गूंड पाटील,दिपक घोडके पाटील,अजय गायकवाड,मुकेशजी घुमरे,विशाल दिवटे,अशोक जाधव,मुन्ना जाधव,सुरज पाडुळे,साहिल शेख,यशराज डोके,पविण आनेराव सह सर्व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते...!!

# सरस्वती विद्यालय आचार्य टाकळी या विद्यालयात विद्यार्थ्यांना व्यावसायिक गोडी लागावी म्हणून आनंद नगरीचे आयोजन

सिरसाळा ।प्रतिनिधी

दिनांक २२ रोजी बुधवार आचार्य टाकळी येथे सरस्वती विद्यालय विद्यार्थ्यांना व्यवसाय बनवण्यासाठी आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यालयाचे मुख्यध्यापक श्री कांदे सर यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक मार्गदर्शन केले शिक्षक श्री गायके सर श्री बुकतार सर श्री आचार्य सर श्री माले सर. श्री कस्तुरे सर श्री मुंडे सर. मुंडे सर यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवहाराची माहिती दिली व उद्योजक क्षेत्रामध्ये आपण कशा पद्धतीने उद्योग केला पाहिजे याचे मार्गदर्शन करण्यात आले. या शाळेचे वैशिष्ट्य असे आहे की गेल्या काही वर्षांपूर्वी पासून विद्यार्थी व विद्यार्थिनीला दहावी मध्ये ९७% व ९८ टक्के पर्यंत विद्यार्थी सरस्वती विद्यालयाचे उत्तीर्ण झाले आहेत. . यामध्ये सर्व शिक्षकांचे व मुख्याध्यापकांचे गावकऱ्यांच्या वतीने अनेक वेळा स्वागत करण्यात आले. परंतु यावेळेस यावेळेस सरस्वती विद्यालय चे आनंद नगरी सारखे कार्यक्रम घेतल्याने विद्यार्थ्यांना मोठे



मार्गदर्शन होत आहे. यावेळी आनंद नगरीमध्ये गावकऱ्यांनी व विद्यार्थी यांच्या पालकांनी मोठ्या उत्साहात उपस्थिती नोंदवली आहे. गावातील प्रतिष्ठित नागरिक सेवा सहकारी सोसायटी चे चेअरमन तुकाराम आचार्य अंगदाचार्य प्रभाकर डाके शेषराव शिंदे व कांबळे मामा बाबासाहेब किरवले केशव घोडके यावेळी उपस्थित होते

# रूपामाता उद्योगसमूहाचे अँड व्यंकटराव गुंड अनमोल रत्न या पुरस्काराने सन्मानित

माजलगाव (सुनिल थोरात)

मुंबई येथे रूपामाता उद्योगसमूहाचे संस्थापक अध्यक्ष अॅड.व्यंकटराव गुंड यांना त्यांच्या कृषी, शैक्षणिक, बँकिंग,विधी, सामाजिक, क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी -इझ माझा या वृत्त वाहिनीने 'महाराष्ट्राचे अनमोल रत्न' या पुरस्काराने सन्मानित केले. मुंबई येथे पार पाडलेल्या कार्यक्रमात माहाराष्ट्राचे महसूल मंत्री श्री.चन्द्रशेखर बावनकुळे साहेब यांच्या हस्ते हा पुरस्कार श्री.गुंड यांनी सपत्नीक स्वीकारला. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रीतील विविध क्षेत्रातील मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते.




आपल्या दूरदर्शीपणाने रुपामाता उद्योगसमूहाला उच्च पूर्ण महाराष्ट्रभर पोचवणारे अॅड.व्यंकटराव गुंड यांच्या योगदानाची दखल घेत हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. रूपामाता उद्योगसमूहाने धाराशिव, बीड, लातूर जिल्ह्यात कृषी, औद्योगिक, बँकिंग, दुग्धव्यवसायाद्वारे शेतकर्यारना उत्पन्नाचे विविध मार्ग उपलब्ध करून दिले असून, युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आहेत. या पुरस्कारामुळे अधिकाधिक उद्योजकांना प्रेरणा मिळणार असून, जिल्हयातील उद्योगांना नवी ओळख मिळणार आहे.हा पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री.गुंड यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. हा पुरस्कार स्वीकारताना मला मनस्वी आनंद होत आहे. हा पुरस्कार म्हणजे संपूर्ण रुयापमाता परिवार, शेतकरी, बँकेचे खातेदार, माझे हितचिंतक, सहकारी मित्र परिवार यांचा गौरव आहे व या सर्वांचा कायम ऋणि आहे

# अभिमानास्पद .... बीडच्या शौर्य शैलेश जाधव यांची महाराष्ट्राच्या १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघात निवड

**बीड ।प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील दोन खेळाडूंची १४ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली ही बातमी अतिशय अभिमानास्पद आहे आपल्या जिल्हयाचा खेळाडू शौर्य शैलेश जाधव हा वयाच्य सहाव्या वर्षापासून क्रिकेटचा सराव करतो आहे आणि त्याची मेहनत व प्रशिक्षक शेख अजहर, संजय धस, सागर सांगळे यांच्या मार्गदर्शना मुळे तसेच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य तथा बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सेक्रेटरी आमेर सलीम याचा जिल्ह्यातील सर्व खेळाडूंना आसलेला खंबीर पाठिंबा यामुळे शौर्यने महाराष्ट्र संघात आपले स्थान निर्माण केले आहे** त्यांने प्रथम बीड जिल्हा कडून खेळताना ९ सामन्यात सर्वाधिक ७६१ धावा करत महाराष्ट्रातील पहिल्या पाच मुलांत आपली जागा निर्माण केली त्यांनतर महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील सर्वाधक धावा करणारे व गोलंदाजीत गडीबाद करणारे जवळपास ८० मुले निवडून त्यांचे सामने महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सलेक्टर व कोच यांच्या समोर पाच सामने खेळवण्यात आले यात देखील शौर्य जाधव याने चार आर्धशतके करत २९७ रन्स करत सर्व मुलांत आपले दुसरे स्थान कायम राखले व पुढील निवडक चोवीस मुलांच्या कॅम्प मध्ये खेळण्यास पात्र ठरला यानंतर आपल्या कौशल्यावर त्यांने यामुलांत देखील चांगली कामगिरी केल्या कारणांने महाराष्ट्राच्या संघात शौर्य जाधवची निवड झाली आहे. या निवडीनंतर बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव आमेर सलीम, राजन साळवी, इरफान कुरेशी, जावेद पाशा,रिजवान भाई, गोपाल गुरखुदे, नासेर मोमीन,शाहरूख पठाण, अतिक कुरेशी, निसार तांबोळी, सुनिल वाघमारे,रोहित जाधव,मोहीत परमार,चंद्रकांत हरकूडे,संतोष कवटेकर, प्रकाश गालफाडे, सुदामजी शेळके, बाबासाहेब गोरे, विजय पिव्हाळ,संजय कुलकर्णी, सखाराम घोडके,राजेश घनघाव,यांच्यासह बीड जिल्हा वकील क्रिकेट संघाने शौर्यला शुभेच्छा देत महाराष्ट्र संघाकडून चांगले खेळण्यासाठी अशिर्वाद दिले




शौर्य जाधवला ज्येष्ठ प्रशिक्षक अजहर शेख, संजय धस, सागर सांगळे, फिटनेस कोच नासेर मोमीन,राहूल जाधव, यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.



युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांची युवासेना राज्यकार्यकारणी बैठकी प्रसंगी युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजित शिंदे व जिल्हाप्रमुख रविराज बडे यांनी भेट घेतली.सोबत मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून स्वयंपूर्णता व श्रमसंस्कार रुजतात - देविदास वाघमोडे

धारूर / प्रतिनिधि

धारूर येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक शिबिर सन २०२४-२५ मौजे अंजनडोह येथे दिनांक २१ ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीत युथ फॉर माय भारत आणि युथ फॉर डिजिटल लिटरसी ही थीम घेऊन आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. देविदास वाघमोडे यांच्या हस्ते झाला. या शिबिरामध्ये सहभागी झालेल्या स्वयंसेवकांनी विद्यापीठाने शिबिरासाठी दिलेल्या थीमच्या अनुषंगाने अंजनडोह गावामध्ये ग्रामस्थांमध्ये, जनतेमध्ये माय भारत संकल्पना व डिजिटल लिटरसी या संकल्पना लोकांना पर्यंत पोहोचवाव्यात. शिबिराच्या माध्यमातून स्वच्छतेसंबंधिचा संदेश गावातील शेवटच्या घटकापर्यंत द्यावा. स्वयंपूर्णता अंगीकृत येण्यासाठी शिबिरे स्वयंसेवकांवर संस्कारांचे धडे देत असतात. आपल्या हातून गावाची सेवा घडावी व ग्रामस्थांना चांगला संदेश जावा असा संदेश दिला. महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे यांनी अध्यक्षीय समारोपातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा आवश्यक असणाऱ्या बाबी घेऊन जाव्यात आणि त्याचबरोबर अंजनाडोह गावातील ग्रामस्थांनी सरपंचांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कामांमध्ये स्वयंसेवकांना सहकार्य करावे असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी मनोगतातून शिबिरामध्ये सहभागी झालेल्या दैनंदिन सेवकांचे स्वागत व अभिनंदन केले. या शिबिराच्या माध्यमातून आपल्याला सेवा करण्याचे भाग्य मिळाले आहे. गावातील जनतेमध्ये स्वच्छतेचे महत्व वैचारिक दृष्टीने, लोक मनोरंजनाच्या सहाय्याने पोहोचविणार आहात. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात होत असणाऱ्या विविध बदलांसंबंधीची माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचविणार आहात. यामध्ये सर्व सनसेवकांनी हिरीगिरीने सहभाग घेऊन जनतेच्या मनात याविषयी सहानुभूती निर्माण होईल असे कार्य करावे असे सांगितले. विशेष




वार्षिक शिबिराचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी केले त्यांनी शिबिराच्या आयोजन मागील भूमिका सांगून सात दिवसांमध्ये होणाऱ्या कामाचे स्वरूप सांगितले. संगणक डिजिटल क्रांती व स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या बौद्धिक सत्रामध्ये डॉ. एल. बी. जाधवर, प्रा. नागोराव वाघमारे, प्रा. स्मिता बसोले, प्रा. विनायक कापावार यांनी स्वयंसेवकांना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी विचार मंचावर सरपंच परमेश्वर सोळंके, उपसरपंच प्रकाश सोळंके, सुधीर सोळंके, दत्ता ढोके, सुदर्शन सोळंके, मुख्याध्यापक देशपांडे सर यांबरोबरच महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य श्री. इं. ना. जाधव, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, प्रभारी कार्यालय अधीक्षक श्री. केशव भोंडवे तसेच प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, अंजनडोह गावचे ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्ता जाधव यांनी तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी मानले.

# बालविवाह व बालमजुरीमुळे सामाजिक समस्या वाढतात-प्रा.विक्रम धनवे

**परळी ।प्रतिनिधी**

**मौजे करेवाडी या ठिकाणी श्री पंडित कर विद्यालय शिरसाळा, स्टेशन सेवा योजना विभागाच्या विशेष युवक युती शिबिराचा आज पाचवा दिवसाची सुरुवात अभ्यासाने केली. नंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी मारुती या देवस्थानाची स्वच्छता केली. दुपारच्या बौद्धिक सत्रामध्ये प्रमुख वक्ते म्हणून प्रध्यापक विक्रम धनवे उपस्थित होते. तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राध्यापक डॉक्टर जी. व्ही. गुट्टे हे उपस्थित होते.** बालमजुरी या



विषयावर विद्यार्थी व गावकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. बालविवाह बालमजुरी मुळे देशाचे समस्यात वाढ होते होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. भावना किरवले. प्रस्ताविक कु. मुक्ता रासवे. तर आभार प्रदीप जाधव याने व्यक्त केले. तर संध्याकाळच्या कार्यक्रमामध्ये बहारदार असा सोंगी भारुडांचा कार्यक्रम शाहीर राजाराम महाराज जगताप. व सोनवणे महाराज. यांनी सादर केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य बडे. व आभार पंढरी लाब. यांनी व्यक्त केले. यावेळी मोठ्या संख्येने परिसरातील सरंपच. उपसरपंच. व गावकरी मंडळी उपस्थित होते.

# जीवन् शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गांजपूर चित्रकला परीक्षेचा निकाल १०० टक्के

धारूर / प्रतिनिधि

धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रस्थानी असलेल्या जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील चित्रकला परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून सर्वच विद्यार्थी ए बी सी ग्रेडने उत्तीर्ण झाले आहेत. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने एलिमेंट्री व इंटरमिजिएट परीक्षेसाठी एकूण ३७ विद्यार्थी बसवले होते, एलिमेंट्री परीक्षेसाठी २४ विद्यार्थ्यांनी तर इंटरमिजिएट परीक्षेसाठी १३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती.

सर्वच विद्यार्थी चांगल्या गुणांनी ए बी सी ग्रेडने उत्तीर्ण झाले आहेत त्यात ७ विद्यार्थ्यांनी ए ग्रेड मिळवला आहे. तर ११ विद्यार्थ्यांनी बी ग्रेड मिळवला




आहे तर १९ विद्यार्थी सी ग्रेडने उत्तीर्ण झाले आहेत सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक विजयकुमार मुंडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

हे चित्रकला चे गुण विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेला उपयोगी येणार आहेत या विद्यार्थ्यांना चित्रकला शिक्षिका सौ भारती सोनवणे यांनी मार्गदर्शन केले आहे सत्कार प्रसंगी मुख्याध्यापक विजयकुमार मुंडे, उपमुख्याध्यापक अरुण समुद्रे, सहशिक्षक महादेव केदार

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT